महाराष्ट्र वन विभाग

कार्यालय - ०२३१/२६५३६३२,
E-mail ID -
ccftkolhapur@mahaoforest.gov.in
ccftkolhapur@gmail.com

**महाराष्ट्र शासन**
**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय**
"वनवर्धन", ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३

महत्वाचे/इमेलद्वारे

क्रमांक कक्ष-६/नोसेल/निर्व.प्र./३१८.०४/२२-२३/ ५६७
कोल्हापूर -४१६००३ दिनांक - १६/०६/२०२२.

प्रति,
उपवनसंरक्षक कोल्हापूर.

**विषय :** Proposal under Forest (Conservation) Act, 1980.
Disforestation of 318.04 ha of forest land for distribution for agriculture purpose to PAP's from 7 villages from Chandoli Wildlife Sanctuary in District Kolhapur, Maharashtra.

**संदर्भ :** १. उपवनसंरक्षक कोल्हापूर यांचेकडील पत्र कक्ष-५/नोसेल/२२-२३/४२ दिनांक ७.०४.२०२२.

विषयांकित प्रकरणी वरील संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत Disforestation of 318.04 ha of forest land for distribution for agriculture purpose to PAP's from 7 villages from Chandoli Wildlife Sanctuary in District Kolhapur, Maharashtra संदर्भात प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे.

सदर प्रस्तावाची तपासणी केली असता खालीलप्रमाणे त्रुटी निदर्शनास येत आहेत.

1. ऑनलाइन पार्ट-१ मध्ये जिल्हाधिकारी यांचेकडील FRA प्रमाणपत्र संदर्भात हमीपत्र अपलोड केलेले नाही.
2. ऑनलाइन पार्ट-१ मधील मादळे येथील क्षेत्राची KML फाइल तपासली असता सदर क्षेत्र दरीचे असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सदर क्षेत्र प्रकल्पग्रस्तांना शेतीसाठी देणे योग्य राहील काय याबाबत उपवनसंरक्षक यांनी तपासणी करून सदर क्षेत्र प्रस्तावामध्ये अंतर्भूत करावे की वगळावे याबाबत योग्य तो निर्णय घेऊन त्यानुसार प्रस्तावामधील क्षेत्र सुधारित करावे.
3. चांदोली राष्ट्रीय उद्यानातील बाधित निवळे,तनाळी,चांदेल,ढाकाळी,तांबवे पैकी कुल्याची वाडी, सोनार्ली पैकी धनगरवाडा व गोठणे या गावची KML फाइल सी.डी. मध्ये सादर करावी.
4. उपवनसंरक्षक कोल्हापूर यांचेकडून केंद्र शासनाकडील दिनांक २०.०५.२०१९ चे मार्गदर्शक सूचनेनुसार अहवाल प्रस्तावात समाविष्ट केलेला नाही.
5. उपवनसंरक्षक यांचेकडून सादर करण्यात आलेल्या प्रोजेक्ट नोट मध्ये No of affected person ८६५ व प्रकल्पग्रस्तांकडून संपादित क्षेत्र ७५३.९७ हे. दर्शविण्यात आलेले आहेत. तथापि Project Resettlement Plan मध्ये No of affected person ७९२ व ७००.५१ हे. दर्शविण्यात आलेले आहे. सदर तफावतीबाबत खुलासा सादर करावा.
6. उपवनसंरक्षक कोल्हापूर यांनी सादर केलेल्या स्थळपाहणी अहवालामध्ये मुद्दा क्र.६ मध्ये अभिप्राय नमूद केलेले नाहीत.
7. ऑनलाइन पार्ट-१ मध्ये नमूद केलेल्या employement मध्ये व हार्ड कॉपीमधील पार्ट-१ मध्ये नमूद केलेल्या employement मध्ये तफावत दिसून येत आहे.

8. प्रमाणपत्र १६ व १७ हे NPV संदर्भात असून सदर प्रस्तावास केंद्र शासनाकडील मार्गदर्शक सुचणेनुसार NPV सूट आहे अशा आशयाचे प्रमाणपत्र प्रस्तावामध्ये सादर केले नाही.
9. प्रमाणपत्र क्र.२८ हे ग्रामसभेच्या ना-हरकत दाखल्याबाबत असून ग्रामसभेची ना-हरकत असलेबाबत नमूद करून प्रस्तावात समाविष्ट केले आहे. तथापि ग्रामपंचायत सादळे-मादळे,जिउर-म्हालुंगे,पेरीड,करंजोशी,भैरेवाडी,अंबपवाडी,वालुर-जावली, माले,नवे पारगाव,मौ. वडगाव, तमदलगे व तासगाव यांनी विरोध दर्शविला आहे. त्यानुसार प्रमाणपत्रामध्ये सुधारणा करून सुधारित प्रमाणपत्र सादर करावे.
10. मौजे माले, वडगाव, तासगाव व दाणोळी या गावाचे लोकेशन मॅप प्रस्तावात समाविष्ट केले नाहीत.
11. प्रस्तावामध्ये वालुर गावाचा समावेश आहे. तथापि लोकेशन व GPS मॅप वारुळ गावाचा सादर केला आहे.
12. मौजे माले, वडगाव, तासगाव व दाणोळी या गावाचे GPS मॅप प्रस्तावात समाविष्ट केले नाहीत.
13. प्रकल्पग्रस्तांकडील संपादित केलेल्या खाजगी जमिनीबाबतचा नकाशा प्रस्तावात समाविष्ट केलेला नाही.
14. मादळे या गावातील गट नं. २१ तसेच अंबापवाडी या गावातील गट नं.१२४१ चा सातबारा प्रस्तावात समाविष्ट केला नाही.

वरीलप्रमाणे त्रुटींचे अनुषंगाने पूर्तता करून अहवाल आवश्यक दस्तऐवजासह तात्काळ या कार्यालयास सादर करावा. आपलेकडून सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाची प्रत यासोबत परत पाठविण्यात येत आहे.

(आर.एम.रामानुजम)
**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),**
**कोल्हापूर.**